**B.Aadhar' *International Multidisciplinary Research Journal***
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

# श्रीमति इंदिरा गांधी यांचे भारताच्या विकासातील योगदान एक अध्ययन

**प्रा.डॉ. व्ही.जी.वसु**
डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्यालय, पातूर जि.अकोला

**प्रस्तावना**

इंदिरा गांधी हया भारताचे भूतपूर्व प्रधानमत्री पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या कन्या होत. १९नोव्हेंबर,१९१७रोजी इंदिराजीचा जन्म झाला होता. तेंव्हा सरोजिनी नारूयडूंनी एकतार पाठवून म्हटले होते की ती भारताचा नवीन आत्मा आहे". पंडित जवाहरलाल नेहरू सदैव कारावासात किंवा कारावासाच्या बाहेर राजकारणात व्यस्त राहत होते. परंतू सुज्ञ पित्याप्रमाणे त्यांनी इंदिराजीचे लालन-पालन व शिक्षणाकडे जाणिवपूर्वक लक्ष दिले. इंदिरा प्रियदर्शनीचे प्रारंभिक शिक्षण स्वित्झरलंडला झाले. त्यानंतर तीला शिक्षणाकरिता शांतिनिकेतनमधे ठेवले. शांतिनिकेतनमधील शिक्षण आटोपल्यानंतर इंदिरा शांतीनिकेतनचा निरोप घेतांना गुरू रविन्द्रनाथ टागोरांनी पंडीत जवाहरलाल नेहरूंना पत्र लिहले होते. त्या पत्रात त्यांनी लिहले, "आम्ही अत्यंत जड मनाने इंदिराला निरोप दिला आहे ती या ठिकाणाची शोभा होती. मी तिला अगदी जवळून पाहिले आहे. तुम्ही ज्या पध्दतीने तिचे लालन-पालन केले त्यांची प्रशसा केल्याशिवाय राहवल्या गेले नाही." शांतीनिकेतनच्या शिक्षणानंतर इंदिराने ऑक्सफोर्डमधील समरविले कॉलेजमध्ये शिक्षण प्राप्त केले.

**श्रीमती इंदिरा गांधी यांचे सामाजिक कार्य**

जेव्हा इंदिराजी ऑक्सफोर्डच्या समरविले कॉलेजमध्ये अध्यन करीत होती तेव्हा तेथील लेबर पार्टीच्या आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता. कारण या पक्षाची भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला सहानुभुती होती. १९३८ला वयाच्या२१व्या वर्षी इंदिराजी भारतीय काँग्रेसमधे सहभागी झाल्या. इ.स.१९४२ला इंदिराजीचा विवाह समाजवादी विचाराच्या श्री.फिरोजगांधीशी झाला आणि काही दिवसानंतर दोघांनाही स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागामुळे तुरूंगातजावे लागले. अशाप्रकारे अलाहाबादच्या नैनी तुरूंगात त्यांना तेरा महिने व्यतित करावे लागले. तुरूंगातून सुटल्यावर त्यांनी उत्साहाने समाजकार्य सुरू केले. १९४६ला पंडित नेहरू व्हाईसरॉयच्या कौन्सिलचे उपाध्यक्ष बनुन दिल्लीला आले. इंदिराजीही त्यांच्यासोबतच दिल्लीस आली. राष्ट्राच्या प्रत्येक संकटाच्या काळात इंदिराजी कधीही मागे हटल्या नाहीत आणि सदैव स्वताला समस्या सोडविण्यात व्यस्त ठेवले. देशाच्या विभाजनाच्यावेळी १९४७मध्ये पाकीस्थानातून येणाऱ्या शरणार्थीना सुखसोयी पुरविण्यात त्यांनी ज्याप्रकारे कार्य केले त्यामुळे त्यांचे सामाजिक कार्य व कर्तबगारी सर्वांना दिसुन आली.

भारताला स्वातंत्र्य मिळाले पं.नेहरू पंतप्रधान झाले इंदिराजींना त्यांचे नीजी सचिवाचे काम करावे लागले. १९५५ला त्यांना काँग्रेसच्या कार्यसमीतीत सहभागी करण्यात आले व १९६०ला आपल्या कर्तबगारीने काँग्रेसच्या अध्यक्षा बनल्या. काँग्रसच्या अध्यक्षा म्हणून इंदिराजींनी संपूर्ण देशाचा दौरा केला काँग्रेसजनामधे विशेषता तरूणांमध्ये नवीन-उत्साह, नवीन चेतना निर्माण केली आणि केरळच्या निवडणूकीत अभुतपूर्व यश प्राप्त केले. इ.स.१९६२ला चीनने विश्वासघात करून भारतावर आक्रमण केले तेव्हा देशाच्या कर्णधारांना स्वर्णदान देण्याचे आवाहन केले. इंदिराजी संपूर्ण पैतृक स्वर्ण आभुषणे देशाला दान देणारी प्रथम स्त्री होती. चीनच्या आक्रमणाच्या संकटकालीन स्थितीत केंद्रीय नागरिकपरिषदेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. या परिषदेची जबाबदारी किती मोठी होती ते आज कल्पनातित आहे. आक्रमणकारी चीनला देशाबाहेर करण्याकरिता जन-सहकार्याला प्रोत्साहित करणे, जवानांना हरप्रकारचे साहित्य व सोयी उपलब्ध करून देणे, सर्व राजकीय पक्षांमध्ये पूर्ण समन्वय व सहकार्य निर्माण करणे,जवानांना हरप्रकारचें साहित्य व सोयी उपलब्ध करून देणे. सर्व राजकीय पक्षांमध्ये पूर्ण समन्वय व सहकार्य निर्माण करणे, सोपे कार्य नव्हते. १९६४मध्ये नेहरूजींच्या निधनानंतर लाल बहादूर शास्त्री पंतप्रधान झाले पाकीस्थानने कुरापत काढून आक्रमण केले. १९६५च्या पाकीस्थान आक्रमणाचेवेळीसुध्दा इंदिराजींनी दिवस-रात्र एक करून राष्ट्रसेवा केली. भारतीय जवानांच्या उत्साह वर्धनाकरता, सान्तवनाकरिता त्या युध्दाच्या अंतीम मोर्चापर्यत निर्भिडपणे जाऊन आल्या केंद्रीय सरकारच्या सूचना व प्रसारण मंत्रलयात त्यांनी ज्या सुधारणा व प्रशंसनीय पध्दतीने कार्य केले त्यामुळे त्यांची योग्यता सिध्द झाली.

**श्रीमती इंदिरा गांधी यांचे राजकीय कार्य**

ताश्कंद करार झाल्यावर प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्रीचं हृदयविकाराने तेथेच निधन झाल्यावर १९जानेवारी१९६६ला देशाने इंदिराजींना आपला प्रधानमंत्री निवडले. २४जानेवारीला दुपारी २.१५ मिनिटांनी राष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन यांनी त्यांना प्रधानमंत्रीपदाची शपथ दिली. इंदीराजी प्रधानमंत्री झाल्या तेव्हा काँग्रेसमधील मोरारजी देसाई, रा.का.पाटील इत्यादी सर्व ज्येष्ठ नेते त्यांच्या विरोधात होते. १९६७च्या सार्वत्रिक निवडणूकीत अतिशय विरोधी वातावरणात इंदिराजींनी परिश्रम घेऊन केंद्रात कसँग्रेसल स्पष्ट बहुमत मिळवून दिले. काँग्रेस सांसदीय पक्षाचा एक गट इंदिराजीकडे होता तर दुसरा गट मोरारजी देसाईकडे होता. मोरारजी देसाई यांनी सांसदीय पक्षनेता म्हणून निवडणूक लढविण्याचा निश्चय केला होता. परन्तु ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांच्या मध्यस्थीने व इंदिराजी

व मोरारजींच्या समजसपणाने निवडणूकीचे संकट टळले व इंदिराजी निर्विरोध सांसदीय पक्षाचा नेता बनल्या. त्यांनी पुन्हा प्रधानमंत्री पद सांभाळून नवीन मंत्रीमंडळ बनविले.

१९६७ला प्रधानमंत्री बनल्यावर त्यांनी देशाच्या हिताकरिता मोठ-मोठ अटळ निर्णय घेतल्यावर त्यांनी कधीही माघार घेतली नाही. देशातील दारिद्र्य हटविणे त्यांनी आपले मुख्य उद्दिष्ट बनविले. त्यांनी देशामध्ये समाजवाद आणण्याच्यादृष्टीने रचनात्मक पाऊले उचलण्यास सुरवात केली. जुन्या भांडवलदारी सहकाऱ्यांची पर्वा न करता त्यांनी बँकाचे राष्ट्रीयीकरण केले. त्यापुढे त्यांचे जुने सहकारी अतीशय नाराज झाले. परन्तु देशाच्या सामान्य जनतेने त्या घोषणेचे अभूतपूर्व समर्थन केले. त्यानंतर अन्नधान्याच्या ठोक व्यापाराचे राष्ट्रीयकरण केले. भांडवलदार व भांडवलशाही सहकाऱ्यांचा विरोध पत्करून त्या आपल्या निर्णयावर अटळ राहिल्या. याच सहकाऱ्यांनी इंदिराजीला नमविण्याकरिता व नियंत्रीत करण्याकरिता राष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत नीलम संजीव रेड्डी नाव निश्चीत केले. इंदिराजींनी त्यांना विरोध केला व व्ही.व्ही.गीरी याचे समर्थन केले. राष्ट्रपतीपदाच्या निवडूकीत व्ही.व्ही.गीरींना निवडून देशाने पुन्हा इंदिराजींना समर्थन दिले.

भारतीय जनता पक्ष आपल्या दृढ आत्मशक्तीच्या भरवशांवर इंदिराजीने जुन्या काँग्रेसी नेत्यांना बाजुला करून काँग्रेसचे विभाजन केले आणि नवीन पीढीच्या नेत्यांनासोबत घेवून मार्गक्रमण सुरू ठेवले. दिल्लीमध्ये भारतीय काँग्रेसचे विशेष अधिवेशन बोलावून सी.सुब्रम्हण्यमला काँग्रेसच्या अन्तरिम अध्यक्ष बनवून व नंतर मुंबईच्या खुल्या महाअधिवेशनात काँग्रेसच्या अध्यक्षपदावर बाबु जगजीवनरामला विराजमान केले. केंद्रसरकार दृढ व स्थिर असून मध्यावधी निवडणुका होणार नाही अशी घोषणा केली. परंतु वेळेची गती पाहता, देशातील अनिश्चितता, पराश्रयता व संदिग्धावस्था संपविण्याकरिता, डिसेंबर१९७०च्या पहिल्या आठवड्यात पाचवी सार्वत्रिक निवडणूक घेण्याचा निश्चय झाला. यावेळेस इंदिरा गांधीनी देशासममोर गरीबी हटाओ हा नारा देवून निवडणूकाला तोंड दिले. आणि इंदिराजींच्या व्यक्तीमत्वाने व परिश्रमाने इंदिरा गांधीच्या नेतृत्वातील काँग्रेसला २/३ बहुमत मिळाले आणि त्याचबरोबर घटनेत बदल करण्याचाही अधिकार मिळाला. १९७२च्या दहा प्रांतातील निवडणूकांमध्ये काँग्रेसला अभूतपूर्व यश मिळाले. १९७१मधील भारत-पाकिस्थान युध्दोत्तर बांगलादेशाची निर्मिती, शिमला करार,जागतिक राजकारणात दबदबा याने हा काळ इंदिराजींच्या यशाचा व गौरवाचा काळ ठरला.

काळ बदलण्यास उशीर लागत नाही तसेच तो कधी बदलेले हे कोणासही सांगता येत नाही. नोव्हेंबर,१९७७मध्ये कर्नाटकमधील चिकमंगलूर सांसदीय क्षेत्राम ून त्या लोकसभेची निवडणूक जिंकून आल्या. परंतु संसदेच्या विशेषाधिकार समितीने, विशेषाधिकार हनन या आरोपाखाली दोषी ठरवून, तयांना २०नोव्डिसेंबर,१९७८ला लोकसभा सदस्यत्वापासुन वेचित करून संसदेच्या सत्रवसनापर्यंत त्यांना तुरूंगात पाठविले. परन्तु जनतापक्षातील परस्पर फुट,इर्ष्या व पदलोलुपताचा संघर्ष, इत्यादींचा फायदा इंदिरा गांधीना सहज मिळत गेला. पक्षांतरमुळे ११जुलै,१९७९ला मोरारजी देसाईंच्या जनता सरकारला राजीनामा द्यावा लागला. श्रीमती इंदिरा गांधींच्या समर्थनाने २८जुलै,१९७९ला चरणसिंहांच्या नेतृत्वात लोकदल पक्षचे सरकार बनले. चरणसिंहाला संसदेचे विश्वासमत प्राप्त होण्यापूर्वीचे काही कार ांनी इंदिराजींनी आपले समर्थन परत घेतले. परिणामी चरणसिहांना राजीनामा द्यावा लागला. राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यां ी लोकसभा भंग करून मध्यावधी निवडणूक घेण्याची घोषणा केली. चरसिंह निवडणूकीपर्यंत कामचलाऊ प्रधानमंत्री बनुन राहिले.

पहिल्यांदाच विरोधी पक्षानेता म्हणून इंदिराजी निवडणूक लढण्यास मैदानात उतरल्या. अनेक विरोध व अडचणी असतांना एकटया इंदिरा गांधींच्या व्यक्तिमत्वाने व त्याविषयी जनतेत असलेल्या आकर्षणाने काँग्रेस(इ)ला प्रतिसाद मिळू लागला. देशाला गंभीर व अडचणीच्या परिस्थितीत सावरून शकणारा एकमेव नेता म्हणून देशाला इंदिरा गांधी दिसु लागल्या. इंदिरा लाओ देश बचाओ असा नारा देण्यात आला. दिनांक ३जानेवारी,१९८०ला इंदिराजीने भारताच्या प्रधानमंत्री पदीची शपथ ग्रहण केली.

प्रधानमंत्री पद ग्रहन करताच त्यांनी देशातील व्याप्त समस्यांना सोडविण्याकरिता प्रभावशाली पाऊले उचलल्या. १९८२मध्ये दिल्लीमध्ये नववे आशियाड खेळ सफलतेने आयोजित करून देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्दी व गौरव मिळवून दिला. १९८३मध्ये अलिप्तता देशांचे ७वे सम्मेलन दिल्लीमध्ये आयोजित केले. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात अलीप्तता राष्ट्र चळवळीचे मोठे नेते फिडेल कॅस्ट्रो व यासेर यराफत यांनी इंदिरा गांधींना जगातिल 'महान मुत्सदी' म्हणून संबोधिले. त्यांच्याचकाळात भारत अण्वस्त्रधारक राष्ट्र बनले. तसेच राकेश शर्मा भारतातील प्रथम अंतराळवीर बनला. भारतीय महिला, बचेन्द्रीपालने एव्हरेष्टचे शिखर चढून तेथे तिरंगा ध्वज फडकविला.

अलगाववादी व आतंकवादी कार्यवाहीतून पंजाबला मुक्त करण्याकरीता पुन्हा इंदिराजी अग्नीपरीक्षेतून जावे लागले. त्यांच्या कुशल नेतृत्वात पंजाबमध्ये ३जुन१९८४ला 'ब्लुस्टार ऑपरेशन'या नावाने सैनिक कारवाई करावी लगली. अमृतसरच्या सुवर्णमंदिरातील अकालतत्काला हानी झाल्यामुळे भारतातील शिख बांधव धार्मिकदृष्टया दूखावले गेले. परन्तु देशहिताकरिता त्यांना ते सहन करावे लागले. शिख बांधवाविषयी त्यांच्या मनात कोणतीही शंका किंवा दुर्भावना नव्हती. म्हणूनच त्यांच्या अंगरक्षकांमध्ये शिखसुध्दा त्यांनी कायम ठेवले परन्तु स्वार्थी व धर्मान्ध प्रवृत्तीच्या लोकांनी अशा अंगरक्षकाने फितवले, त्याचा परिणाम म्हणून ३१ऑक्टोबर,१९८४ला सकाळी ९.१५वाजता आपल्या सफदरजंग रस्त्यावरील बंगल्यातून अकबर रोडवरील कार्यालयात केवळ पाच मिनिटांचा रस्ता पायदळ पार करीत असतांना तीन धर्मान्ध अंगरक्षक जवानांनी त्यांची हत्या केली. श्रीमती इंदिरा गांधींचा मृत्यू झाला परंतु भारताच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी केलेली कामगीरी अजरामर ठरली. ति कधिही विसरता येणे शक्य नाही.

संदर्भग्रंथ सूचि

(१) अलेक्झांडार पी.सी - इंदिरा अंतीमपर्व
(२) वैद्य सुमन व कोठेकर शांता - स्वंतंत्र भारताचा इतिहास
(३) तिवारी विरेंद्रकूमार - इंदिरा गांधीका भारतिय राजनितिमे योगदान.
(४) दौलतराम बि.ए. - इंदिराजीके बढते कदम
(५) शर्मा जयविर प्रताप - इंदिरा गांधी यूवाओंकी प्रेरणा
(६) मौडकर माधव - माझे सत्वस्वरूप इंदिरा गांधी
(७) प्रा.पारधी आर.एन. - भारतिय स्त्री जीवन व कर्तृत्व
(८) जयकर पुपुल - अनुवाद - अशोक जैन-इंदिरा गांधी.
(९) आचार्य-डॉ.धनंजय - यूध्दरत भारत(१९४७ ते १९७१)